इयत्ता अकरावीचे प्रवेश देतांना कला व क्रीडा
क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांना
अनुक्रमे २ व ३ टक्के जागा राखून ठेवण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एचएससी-१७०७/(२२२/०७)/उमाशि-१.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २५ मार्च, २०१०.

वाचा :- १) शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग, क्रमांक:-एचएससी-१०९७/(१४४४/९७)/उमाशि-१. दिनांक २६.६.१९९७.
२) शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:- एचएससी-१७०७/(२२२/०७)/उमाशि-१. दिनांक २६.६.२००८.
३) शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्रमांक एचएससी १५२०१०/३१६८६/१२एचएस/२८७८ दि.१० मार्च २०१०
४) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचे पत्र क्रमांक शिउसं/मुंवि/ऑनलाईन प्रवेश/२००९-१०/५५४, दिनांक ५ मार्च, २०१०.
५) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचे पत्र क्रमांक ए-१३/शिउसं/ मुंवि/ऑनलाईन प्रवेश/२००९-१०/६९८, दिनांक १८ मार्च, २०१०.

**शासन निर्णय :-** शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग, क्रमांक :-एचएससी-१०९७/(१४४४/९७)/उमाशि-१. दिनांक २६.६.१९९७. अन्वये इयत्ता ११ वी च्या वर्गात प्रवेश देण्यासंबंधी कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये कला व क्रीडा क्षेत्रात जिल्हा/राज्य/राष्ट्रीय पातळीवर प्रथम वा द्वितीय क्रमांक मिळविणा-या विद्यार्थ्यांसाठी २ टक्के जागा राखून ठेवण्यात याव्या व त्या जागा गुणवत्तेनुसार भराव्यात अशी तरतूद करण्यात आली आहे. तद्नंतर शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक एचएससी-१७०७/(२२२/०७)/उमाशि-१. दिनांक २६.६.२००८. अन्वये क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी चे प्रवेश देतांना ५ टक्के जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. आता या शासन निर्णयाद्वारे इयत्ता अकरावीचे प्रवेश देतांना कला व क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांना अनुक्रमे २ व ३ टक्के जागा राखून ठेवण्यात याव्यात असे आदेश देण्यात येत आहेत. या जागा गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. क्रीडा क्षेत्रातील आरक्षणाबाबत दिनांक २६ जून,२००८ च्या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील.

२. कला क्षेत्रातील आरक्षित प्रवेशासाठी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय या संस्थेच्यावतीने संगीत व नृत्य कला प्रकारासाठी घेण्यात येणा-या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

३. सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित बालनाटय स्पर्धेत ज्या विद्यार्थ्यांना अभिनयाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे अशा विद्यार्थ्यांना कला क्षेत्रातील आरक्षित प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

४. कला व क्रीडा प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्याला अनुक्रमे संचालक, सांस्कृतिक कार्य,महाराष्ट्र राज्य अथवा सांस्कृतिक कार्य संचालनालयातील सक्षम अधिकारी आणि जिल्हा क्रीडा

अधिकारी/विभागीय क्रीडा उपसंचालक यांचेकडून प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

५. कला व क्रीडा क्षेत्रातील इ. ११ वी प्रवेशासाठी राखीव जागांचा लाभ घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांने इयत्ता ८ वी, ९ वी व १० वी मध्ये शिकत असताना सदरहू स्पर्धामध्ये सहभाग घेऊन प्राविण्य प्राप्त केले असले पाहिजे.

६. कला व क्रीडा क्षेत्रात जागांच्या प्रमाणात पुरेसे विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास रिक्त जागा अंतर्गत परिवर्तनाने भरण्याची मुभा राहील. अंतर्गत परिवर्तनाने जागा भरुनही शिल्लक राहिल्यास त्या खुल्या संवर्गातून भरण्यात येतील.

७. सदर शासन निर्णय सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत आहे.

८. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१००३२५१७०२१६००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

( अ. मा. भट्टलवार )
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे ( ५ प्रती)
संचालक, सांस्कृतिक कार्य,महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती)
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद
सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी
सर्व शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम),बृहन्मुंबई
अवर सचिव (माशि-२/क्रीयुसे),शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी (माशि-३/क्रीयुसे-१/२), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य), यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण)यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई

त्यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयास सर्व प्रसिध्दी माध्यमाद्वारे व्यापक प्रसिध्दी द्यावी.

निवड नस्ती, उमाशि-१,

G:CR.222.07 2232010.lwp

# सक्षम प्राधिका-याने द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना

असे प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी -----------------

-------------------------------------------------------------------याने/ हिने

--------------------------------------------- या कला/ क्रीडा स्पर्धेमध्ये

सहभाग घेऊन प्राविण्य प्राप्त केले आहे. तो /ती इयत्ता ११ वी प्रवेशासाठी कला/ क्रीडा कोटयातून प्रवेश घेण्यास पात्र समजण्यात यावा / यावी.

**ठिकाण :--**

**दिनांक :--**

**सक्षम अधिका-याची स्वाक्षरी**
**व शिक्का**